**ई-पंचायत/संग्राम प्रकल्पाअंतर्गत प्राप्त झालेल्या ११ आज्ञावलीच्या अंमलबजावणी संदर्भात पंचायतीराज संस्था मधील जबाबदारीचे स्तर निश्चित करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र :- संग्राम-२०१२/प्र.क्र. १४७ /संग्राम कक्ष
बांधकाम भवन, मर्झबान रोड,
मुंबई - ४०० ००१
दि . १६ जानेवारी, २०१३

**संदर्भ :- शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२०११/ प्र.क्र.६/ पंरा-३/ दि.२६ एप्रिल,२०११ व दि. ३० एप्रिल, २०११**

**प्रस्तावना** : - पंचायती राज संस्थांचे बळकटीकरण करुन त्यांचे कारभारात सुसूत्रता व पारदर्शकता आणण्याच्या हेतूने केंद्र शासनाच्या पंचायती राज मंत्रालयाने **ई-पंचायत हा Mission Mode Project** सर्व राज्यांमध्ये राबविण्याच्या निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पाअंतर्गत राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचे संगणकीकरण व त्यांचा दैनंदिन सर्व कारभार ऑनलाईन करणे तसेच सर्व शासन ते शासन अहवाल (Govt. to Govt, G2G), शासन ते व्यापारी सेवा (Govt. to Business, G2B) उदा. परवाने इ., शासन ते नागरिक सेवा (Govt. to Citizen, G2C) उदा. जन्म, मृत्यू, विवाह, रहिवास दाखले, उत्पन्न दाखला, ई., शासन ते कर्मचारी सेवा (Govt. to Employees, G2E) उदा. सेवापुस्तके इ. सेवा ऑनलाईन देणे अपेक्षित आहे. या सर्व प्रकारच्या कामकाजाशी निगडीत असणा-या एकूण अकरा प्रकारच्या आज्ञावली पंचायती राज मंत्रालय, नवी दिल्ली यांनी राष्ट्रीय सूचना केंद्र (NIC) नवी दिल्ली, यांचे मदतीने बनविलेल्या आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय : -

i) या शासन निर्णयाद्वारे ई-पंचायत प्रकल्पाअंतर्गत सर्व आज्ञावलीचा वापर पंचायती राज संस्थांमध्ये करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पंचायती राज संस्थांसाठी वापरात येणा-या आज्ञावली व त्यांची थोडक्यात उद्दीष्टे खालील तक्यामध्ये नमूद करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | आज्ञावली | थोडक्यात उद्देश |
|---|---|---|
| १ | लोकल गर्व्हर्नमेन्ट डिरेक्टरी (Local Government Directory) http://panchayatdirectory.gov.in http://lgdirectory.gov.in | • सर्व पंचायतीराज संस्थाना विशिष्ट संकेतांक देवून तो संलग्न आज्ञावलीसाठी वापरात आणणे<br>• ई-पंचायत अंतर्गत सर्व Software ला लागणारा Basic Data हा पंचायत डिरेक्टरीमध्ये दर्शविला जातो<br>• लोकसभा/विधानसभा मतदार संघाचे मॅपिंग करणे. |
| २ | एरिया प्रोफाइलर (Area Profiler) http://areaprofiler.gov.in | • सर्व पंचायतीराज संस्थांचे भौगोलिक क्षेत्र, सामाजिक,आर्थिक, भौतिक सोई-सुविधा तसेच संबंधीत पंचायतीराज संस्थेमधील लोकप्रतिनिधींची माहिती<br>• ग्रामपंचायत स्तरावर कुटुंब नोंदणी व्यवस्थापन<br>• सर्व पंचायत स्तरांवरील निवडणूक व निवडून आलेल्या प्रतिनिधींची माहिती<br>• सर्व पंचायत स्तरांवरील कार्यालयीन कामकाजाच्या तपशीलाचे व्यवस्थापन |
| ३ | प्लॅन प्लस (Plan Plus) http://planningonline.gov.in | • निधीचे सूक्ष्मनियोजन<br>• निधीचा पुरेपूर विनियोग व नियंत्रण |
| ४ | प्रियासॉफ्ट (PRIASoft) http://accountingonline.gov.in | • पंचायतीराज स्तरावर म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या जमा खर्चाचे लेखे व इतर अनुषंगिक अहवाल उपलब्ध करुन घेणे<br>• लेख्यांमध्ये पारदर्शकता, अचुकता व तत्परता आणणे. |
| ५ | ॲक्शन सॉफ्ट (ActionSoft) http://reportingonline.gov.in | • पंचायतीराज संस्थाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी व देखरेख.<br>• निधीचा योग्य वापर<br>• कामाचा भौतीक व वित्तीय प्रगतीचा आढावा |
| ६ | ॲसेट डिरेक्टरी (Asset Directory) http://assetdirectory.gov.in | • पंचायती राज संस्थांच्या मालकीच्या तसेच अधिपत्याखालील सर्व स्थावर व जंगम मालमत्तांचे अभिज्ञान व व्यवस्थापन |
| ७ | सर्व्हिस प्लस (ServicePlus) http://serviceonline.gov.in | • पंचायतीराज संस्थाकडून नागरिकांना सर्व प्रकारच्या सेवा (प्रमाणपत्रे / दाखले) या सॉफ्टवेअरद्वारे रहिवास क्षेत्रातच उपलब्ध होणार आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ८ | सोशल ऑडीट (Social Audit) http://socialaudit.gov.in | • पंचायतीराज स्तरावर राबविण्यात येणा-या योजनांचे सामाजिक लेखा परिक्षण. |
| ९ | ट्रेनिग मॅनेजमेन्ट (Training Management) http://trainingonline.gov.in | • पंचायतीराज संस्थांच्या कारभाराशी निगडीत सर्व संबंधितांना प्रशिक्षणाचे ऑनलाईन व्यवस्थापन. |
| १० | नॅशनल पंचायत पोर्टल (National Panchayat Portal) http://panchayat.gov.in | • सर्व पंचायतीराज संस्थांची संकेतस्थळे व त्यांचेशी संलग्न संपूर्ण माहिती उपलब्ध करणे. |
| ११ | बेसिक GIS प्रणाली ( GIS layer) | • सर्व पंचायतीराज संस्थाचा परिपूर्ण, तथा सर्वसमावेशक भौगोलिक नकाशा व त्या अनुषंगाने विविध योजनांच्या नियोजनास माहितीची उपलब्धता. |

ii) प्लॅन प्लस या आज्ञावलीचा वापर सर्व जिल्हयात करणे :- यापूर्वी प्लॅन प्लस या आज्ञावलीचा वापर हा राज्यातील मागास क्षेत्र अनुदान निधीचा (बी.आर.जी.एफ) वापर करणा-या फक्त १२ जिल्हयापुरताच मर्यादित होता. तथापि आता केंद्रशासनाचे निर्देश व त्यानुसार मा. मुख्य सचिवांनी दि. २१ सप्टेंबर, २०१२ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या (High Power commitee) बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार प्लॅन प्लस ही आज्ञावली (Software) राज्यातील सर्व जिल्हयातील (बीआरजीएफ जिल्हयांसह) पंचायती राज संस्थांनी वापरणे या शासन निर्णयाद्वारे अनिवार्य करण्यात येत आहे.

iii) ई-पंचायत अंतर्गत प्राप्त आज्ञावलीचा वापर करण्यासाठी सर्व जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या विविध विभागांशी संबंधित माहिती संगणक परिचालकांना ऑनलाईन भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यास्तव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, प्रकल्प संचालक (जि.ग्रा.वि.यं.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि / ग्रा.पं/महिला व बालकल्याण ), सर्व कार्यकारी अभियंता, सर्व खातेप्रमुख, गटविकास अधिकारी, त्यांचे कार्यालयातील कार्यालयीन अधिक्षक व इतर कर्मचारी, विस्तार अधिकारी (ग्रा.पं/ सांख्यिकी/ कृषी/ ए.ग्रा.वि.का./उदयोग/आरोग्य/शिक्षण), लेखा विभागाचे कर्मचारी, शाखा अभियंता ( बांधकाम / पाणीपुरवठा / लघुपाटबंधारे ) व ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी या सर्वांना आपल्या विषयाशी संबंधित माहिती प्रमाणित (Vetting) करुन देण्याबाबत तात्काळ आदेशित करावे.

उपरोक्त अधिका-यांनी प्रमाणित केलेली माहितीच संगणक परिचालकाला आज्ञावलीत भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

**सदरच्या सर्व आज्ञावली हया Public Domain वर असल्याने यामध्ये चुकीची वा सदोष माहिती भरल्यास संबधित अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल.**

iv) जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींनी ई-पंचायत अंतर्गत असलेल्या सर्व आज्ञावलीसाठी आवश्यक असलेली माहिती प्रमाणित करुन ती भरुन घेण्याची प्राथमिक व पर्यवेक्षीय जबाबदारीचे स्तर खालील तक्यात नमूद केल्याप्रमाणे असतील.

| अ.क्र. | पंचायतीराज स्तर | प्राथमिक जबाबदारी | पर्यवेक्षीय जबाबदारी | संनियत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी | विस्तार अधिकारी (पंचायत) गटविकास अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | पंचायत समिती | गटविकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | जिल्हा परिषद | माहितीशी संबंधित असलेले खाते प्रमुख | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**v) ई-पंचायत प्रकल्पासाठी सनियंत्रक अधिकारी व नोडल ऑफीसर**

**अ)** विभागीय स्तरावर संनियंत्रण अधिकारी विभागीय आयुक्त असतील व उपायुक्त (विकास) हे या प्रकल्पासाठी त्या विभागाचे Nodal officer असतील.

**ब)** जिल्हा परिषद स्तरावरील सनियंत्रण अधिकारी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद असतील. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे जिल्हा परिषद स्तरावरील या प्रकल्पाचे नोडल ऑफीसर असतील.

**क)** पंचायत समिती स्तरावरील सनियंत्रण अधिकारी संबंधित गटविकास अधिकारी असतील तर Nodal Officer विस्तार अधिकारी (पंचायत) असतील.

**ड)** ग्रामपंचायत स्तरावरील नियंत्रण अधिकारी संबंधित विस्तार अधिकारी (पंचायत ) असतील तर Nodal Officer संबंधित ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी असतील.

**vi) या प्रकल्पांतर्गत प्राप्त झालेल्या आज्ञावलीकरिता खालील तक्यात नमूद केलेले अधिकारी अंमलबजावणी अधिकारी असतील.**

| अ.क्र. | आज्ञावलीचे नांव | अंमलबजावणी अधिकारी |
|---|---|---|
| १ | लोकल गर्व्हर्नमेन्ट डिरेक्टरी http://panchayatdirectory.gov.in http://lgdirectory.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) |
| २ | एरिया प्रोफाइलर http://areaprofiler.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) |
| ३ | प्लॅन प्लस http://planningonline.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा |
| ४ | प्रियासॉफ्ट http://accountingonline.gov.in | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (जिल्हा परिषद, पंचायत समिती स्तर), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) ग्रामपंचायत स्तर |
| ५ | अॅक्शन सॉफ्ट http://reportingonline.gov.in | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रमुख), कार्यकारी अभियंता (सर्व), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचे सहाय्याने |
| ६ | अॅसेट डिरेक्टरी http://assetdirectory.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) (प्रमुख), कार्यकारी अभियंता (सर्व), यांचे सहाय्याने |
| ७ | सर्व्हिस प्लस http://serviceonline.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) |
| ८ | सोशल ऑडीट http://socialaudit.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) |
| ९ | ट्रेनिग मॅनेजमेन्ट http://trainingonline.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( सा.प्र.वि.) |
| १० | नॅशनल पंचायत पोर्टल http://panchayat.gov.in | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) |
| ११ | बेसिक GIS प्रणाली | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) |

उपरोक्त तक्यात नमूद केलेल्या अधिका-यांनी संबंधित आज्ञावलीचा दैनंदिन कामकाजात वापर व त्या आज्ञावलीत माहिती अद्यायावत राहील (update) याची खातरजमा करावी.

तसेच जिल्हा परिषदेच्या, पंचायत समितीच्या व ग्रामपंचायतीच्या संकेत स्थळावरील (वेबसाइट) माहिती प्रमाणित व अद्यायावत राहील याची दक्षता प्रत्येक स्तरावरील संबंधित सनियंत्रण अधिकारी व नोडल ऑफीसर यांनी घ्यावी. (सदर माहिती ही युनिकोड, मराठी मंगल फाँट मध्येच असावी.)

ई-पंचायत प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व गट विकास अधिकारी यांनी सर्व स्तरावर प्रकल्प अंमलबजावणीचा नियमितपणे आढावा घ्यावा.

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण जिल्हयाचे सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पहातील तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे या प्रकल्पाचे नोडल ऑफीसर म्हणून काम करतील.**

ई-पंचायत प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध असलेल्या आज्ञावलीच्या अंमलबजावणी संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयातील राष्ट्रीय सूचना केंद्राचे (NIC) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांनी सर्व जिल्हा परिषदांना तांत्रिक मार्गदर्शन करावे तसेच आवश्यकतेनुसार माहिती व तंत्रज्ञान विभागा मार्फत सर्व जिल्हा परिषदांना देणत आलेल्या पालक तांत्रिक सल्लागार (Guardian Consultant) यांचेही सहकार्य घ्यावे.

हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१३०११६१५४०१९४३२० असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,**

**(एस.एस.संधू)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय
मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
शासनाचे मुख्य सचिव
सचिव, माहिती, तंत्रज्ञान, मंत्रालय मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,

श्री. मोईज हुसेन, राज्य सूचना विज्ञान अधिकारी राष्ट्रीय सूचना केंद्र
तज्ञ सदस्य प्रो.के. पंडया, टाटा इन्स्टीटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (TIFR), मुंबई
सर्व सहसचिव/ उपसचिव (ग्रामविकास)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा सर्व
मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत/सा.प्र.वि)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
मुख्य कार्यचालन अधिकारी, महाऑनलाईन,
जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (NIC), जिल्हाधिकारी कार्यालय सर्व
स्वीय सहायक (प्रधान सचिव( ग्रा.वि) ) मा.प्रधान सचिव (ग्रा.वि.) यांचे अवलोकनार्थ
कक्ष अधिकारी, (वित्त-४)
निवड नस्ती, संग्राम कक्ष ग्रामविकास व पंचायतराज विभाग

****************************************